जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- / १०४/२०१५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:-२३.१०.२०१५

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची 'ड' चे प्रकरण-2 मधील नियम क्र.1 अन्वये

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे अनुसूचि (ड) चे प्रकरण 2 मधील नियम क्र .१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापौर **सौ.शैलजा किशोर स्वामी** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दि. ३१.१०.२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. नांवाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै .शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

महापौर,
.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति
श्री/श्रीमती ------------------------------------------------------------
सदस्य /सदस्या,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जूलै | ११२३ | ९४७ | १५५८५ | ९१३.२० |

**विषय क्र.२**

शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी एक कार्यालयाच्या इमारतीमध्ये उर्जा संवर्धन तत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी महाऊर्जा कडुन रु.२५.०० लाख पर्यत अर्थसहाय्य उपलब्ध्द होणार आहे. सदर पथदर्शी प्रकल्पा अतर्गत इमारतीतील वापरात असलेली जून्या तंत्रज्ञानाची उपकरणे/यंत्रणा काढून नविन तंत्रज्ञानावर आधारीत उपकरणे बसविणे,उर्जा बचतीसाठी अपारंपारीक उर्जा स्त्रोत्रांताचा किफायतशीर वापर करणे. इमारतीमध्ये उर्जा वापर मोजमाप व मॉनिटरिंग करणारी यंत्रणा बसविणे इत्यादीचा समावेश आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्टेडियम इमारतीतील विद्युत व्यवस्था अत्यंत जुनी असल्यानेसदर प्रकल्प स्टेडियम इमारतीमध्ये राबविण्यासाठी मान्यता देणेस्तव व सदर प्रकल्प हाती घेण्याकरीता महाउर्जा कडील नोंदणीकृत संस्थेकडून संपूर्ण प्रगल्प [illegible]ाल तयार करणे व एनर्जी ऑडीट करुन घेण्यासाठी मान्यतेस्तव व सदरील योजने अंतर्गत नावामनपाकेचा समावेश करण्यासाठी महाउर्जाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देणे बाबत.

**विषय क्र .३**

श्री. किशन जेठबा हाळदे व इतर यांनी दि. 22.04.2010 च्या अर्जामध्ये स.नं.59-बी मौ. वजिराबाद या जमिनीवरील आरक्षणा रद्द करण्याबाबत विनंती केलेली आहे.

तसेच, अर्जदार यांनी यापूर्वी नांदेड शहराच्या मंजूर सुधारित विकास योजने मधील मौजा वजिराबाद येथील स.नं.59 मधील आरक्षण क्र.1-ए 'खेळाचे मैदान', 60.00 मी.विकास योजना रस्ता व 15.00 मी. विकास योजना रस्ता ने बाधित होणा-या जागेबाबत दि.(15/11/2008) ची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 49 अवये शासनास खरेदी सूचना बजावलेली आहे.त्यानुसार शासनाने दि.20.04.2009 च्या पत्रावये सदरची खरेदी सूचना अमान्य केलेली आहे.

अर्जदार यांनी संदर्भ क्रं.(2) अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची नोटीस सादर केली आहे.संदर्भ क्रं.(5) अन्वये सादर केलेल्या अर्जा सोबत मोजणी नकाशानूसार एकूण जागेबाबत बोध होत नसल्यामुळे संदर्भ (6) अन्वये अर्जदाराने दिलेली नोटीस फेटाळण्यात आली आहे.

नांदेड शहराच्या मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये सेक्टर A मध्ये मौ. वजिराबाद मधील स.नं.59 वर आरक्षण क्र. 1-ए 'खेळाचे मैदान ' (क्षेत्र 5.0 हेक्टर), 60.00 मी. विकास योजना रस्ता व 15.00 मी. विकास योजना रस्ता व उर्वरित भाग रहिवास वापरासाठी दर्शवणेत आलेला आहे.

तरी, अर्जदार यांचे दि. 05.03.2014 ची खरेदी सुचना तसेच यापूर्वी मनपास सदर आरक्षणाखालील जागा संपादन करणे कामी तगादा असल्यामुळे तसेच विकास योजना मंजूर होवून दहा वर्षे उलटून गेल्याने आता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची नोटीस लागू होत असल्यामुळे उपरोक्त स.नं.59 वरील आरक्षण क्र. 1-ए 'खेळाचे मैदान' चे भुसंपादन करणे आवश्यक असून सदरची जागा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,1966 चे कलम 126 (4) सह भुसंपादन कायदया चे तरतूदीनुसार संपादन करणे आवश्यक आहे तसे न झाल्यास सदर चे आरक्षण व्यपगत होते.

अर्जदार यांनी दि.19.8.2014 रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची खरेदी सुचना बजावलेली आहे.सदर खरेदी सुचनेच्या अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे दि.26.12.2014 रोजी पाठविण्यात आला आहे.शासनाचे परिपत्रक टिपीएस-2013/प्र.क्रं.547/2013/नवि 30,दि.12.2.2014 नुसार खरेदी सुचना प्राप्त झाल्यापासुन 1 वर्षाच्या कालावधीमध्ये आरक्षणाखालिल जागेच्या भुसंपादनाबाबत कलम 126(2) किंवा (4) अन्वये राजपत्रात प्रसिध्दी करण झाले नसल्यास सदरचे आरक्षण व्यपगत होते.त्यामुळे ज्या उद्देशांसाठी विकास योजना केली जाते तो उद्देश सफल होत नाही व सर्वसामान्य जनतेस आवश्यक सार्वजनिक सोयी सुविधापासून वंचित रहावे लागते.

तरी,प्रस्तुत प्रकरणातील विकास योजनेतील आरक्षण व्यपगत होऊ नये म्हणून सदर जमिन भुसंपादन करण्यास व त्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी वरील प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.४**

**विषय**:- गुरु-त्ता-गद्दी सोहळा 2008 व नांदेड शहर विकास योजना सुधारीत अंतर्गत पश्चिम वळण रस्ता गोदावरी नदी पासुन लातुर रोड 60 मि.रुंद रस्ता भाग-6 मावेजासाठी निधी जमा करणे बाबत.

**संदर्भ** :- उपजिल्हाधिकारी भुसंपादन पात लसिका क्रं-2 नांदेड यांचे पत्र क्रं.2013/भुसं/लसिका-2 दि.30.11.2013

गुरु-त्ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळा 2008 व नांदेड शहर विकास योजना सुधारीत अंतर्गत नांदेड शहराचे विविध भागात रस्त्याचे विकास करणेसाठी खाजगी जागा संपादीत करण्याकरीता प्रस्तावीत प्रमाणे सन-2007-08 मध्ये शासनाकडुन निधी प्राप्त झाला त्याप्रमाणे विषयांकित पश्चिम वळण 60 मि.रुंद रस्ता क्रं.-38अ भाग-6साठी पुढील तपशिल प्रमाणे निधी प्राप्त झाला आहे.

| अ.क्र. | प्रशासकिय मान्यता प्रमाणे प्राप्त निधी | भुसंपादन विभागाकडे 2/3 पोटी अग्रीम जमा केलेली रक्कम | मनपा फंडात जमा असलेली रक्कम | निवाडयानुसार देय होणारी रक्कम | जमा केलेली अग्रीम रक्कम वगळुन देय होणारी रक्कम | प्र.मा.पेक्षा अधिकची लागणारी रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | 64.30 लक्ष | 43.00 लक्ष | 21.30 लक्ष | 34251814 | 29988774 | 27821814 | |

या प्रकरणा बाबत थोडक्यात तपशिल असा आहे. गुरु-त्ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळा 2008 चे अनुषंगाने तातडीने सोहळा साजरा होणेपुर्वी रस्ता करणे अत्यावश्यक होते करिता भुधारकांचे सम्मतीने संपादीत क्षेत्र मनपा तर्फे ताबेत घेऊन रस्त्याचा विकास करण्यात आला आहे व मुळ प्रस्ताव पत्र क्रं.विकाअ/भुसंपादन/मनपा/362/07 दि.24.08.07 अन्वये मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्ताव विशेष भुसंपादन अधिकारी पात लसिका क्रं-2 नांदेड यांचेकडे भुसंपादन कार्यवाहीसाठी दि.11.09.2007. रोजी वर्ग करण्यात आले आहे.

त्यानंतर मा.जिल्हाधिकारी नांदेड यांनी या विभागा कडील कामाचा व्याप पाहाता सदर प्रस्ताव विशेष भुसंपादन अधिकारी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग -1 यांचेकडे वर्ग केले प्रमाणे त्याच्याकडुन कलम 4 (1) ची अधिसुचना प्रसिध्द करण्यात आले नंतर विशेष भुसंपादन अधिकारी इवद

नांदेड यांच्याकडे दि.04.06.2009 रोजी वर्ग केले परंतू त्याचेकडे कामाचा व्याप अधिक असल्याने सदर प्रकरण विशेष भुसंपादन अधिकारी कृष्णा खोरे नांदेड यांच्याकडे दि.05.08.2009 रोजी वर्ग केले प्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

शासनाच्या आदेशाप्रमाणे दि.13.08.2013 पासुन उपजिल्हाधिकारी भुसंपादन कृष्णा खोरे हे निरस्त झाल्यामुळे सदर प्रकरण उपजिल्हाधिकारी भुसंपादन पात लसिका क्रं.-2 नांदेड यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

दि.01.01.2014 पासुन केंद्र शासनाने अस्तीत्वातील पुर्वीचे भुसंपादन अधिनियम 1894 संपुष्टात आणले असुन नविन कायदा लागु केला आहे करीता नवीन कायदा आमलात येण्या तत्पुर्वी निवाडा अंतीम करणेच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग निर्णय क्रं. एल.क्यु.एन. 18/2002/प्र.क्र.53/अ-2 दि.17/01/2008 मधिल निर्देशा नुसार निधीची पुर्तता झाले नंतर निवाडा घोषीत करणे असल्याने भुसंपादन मावेजा पोटी अधिकची लागणारी अंदाजे रुपये 319,56,594/- ची मागणी केली होती. त्यामध्ये सोयी सुविधा 7% ची रक्कम आकारण्यात आली आहे परंतु 7% रक्कम ऐजवी या कार्यालयाकडुन कंप्युटर, लॅपटॉप व संगणक चालक दिले असल्यामुळे वेगळ्याने सोयी सुविधाची रक्कम देण्यात आली नाही. करिता रुपये 2327793/- वगळुन उर्वरीत रक्कम 29628801/- देय आहे.

गुरु-त्ता-गद्दी सोहळा 2008 अनुषंगाने प्राप्त निधी पेक्षा अधिकचा लागणारा निधी महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्रं. गु.ग्र.सा. 2007/प्र.क्र.-35/का-1473 दि.27/07/2007 मधिल निर्देशा नुसार मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्रं. 2007/नियोजन/गुग्रसा दि.15/04/2008 मधिल अट क्रं. 5 मध्ये नमुद केले प्रमाणे शासना कडुन प्राप्त होणार नसुन प्रशासकीय मान्यते पेक्षा अधिकची उर्वरीत रक्कम मनपाच्या फंडातुन खर्च करणे आहे. तथापी उपजिल्हाधिकारी भुसंपादन कृष्णा खोरे याचेकडे वेगवेगळया प्रकरणात अग्रीम रक्कम जमा केलेल्या रक्कमेपेक्षा निवाडयाची रक्कम कमी देय झाल्यामुळे त्याच्याकडील शिल्लक असलेली रक्कम कमी करुन या

प्रकरणात रक्कम रुपये 22101661/- मावेजा पोटी मनपा फंडातुन देणेकरीता दि.07.11.2013 रोजी देयक लेखा विभागाकडे दाखल केले आहे. परंतु मनपा फंडामध्ये भुसंपादनासाठी वेगळ्याने पुरेशी आर्थीक तरतुद केलेली नाही त्यामुळे अद्यापही मावेजाची रक्कम जमा करता आली नाही.

वास्तविक गुरु-त्ता-गद्दी सोहळा 2008 चे अनुषंगाने सदर रस्ता भुधारकाचे मौखीक संम्मतीने पुर्ण करण्यात आला असुन एकुण या रस्त्याचे 6 भाग मध्ये भुसंपादनाची कार्यवाही करण्यात आली त्यापैकी 1 ते 5 भागातील भुसंपादनाचा मावेजा वितरण केला आहे. केवळ याच भागातील भुधारकांना मावेजा वितरण करणे शिल्लक आहे. या रस्त्यासाठी प्रशासकीय मान्यते प्रमाणे प्राप्त निधी रु.64.30लक्ष पैकी रुपये 21.30 लक्ष मनपा फंडामध्ये जमा असुन केवळ रक्कम रु.19971661/- मनपा फंडातुन देय आहे या बाबत वारंवार महावारी भुसंपादन कामाचे आढावा बैठकीत मा.जिल्हाधिकारी यांचेकडुन मावेजा वाटपा साठी निधी जमा करणेसाठी सुचना दिली असुन विलंबामुळे व्याजाच्या रक्कमेचा अधिक भार मनपावर येत आहे. म्हणुन सदर रक्कम मनपा फंडातुन वितरण करणे आवश्यक आहे.

तेव्हा सन 2015-16 चे अंदाज पत्रकात या रस्त्याचे भुसंपादनासाठी मनपा फंडातुन देय रक्कम रुपये 22101661/-जमा करणे साठी मान्यता देण्यास्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**विषय क्र.५**

चौदाव्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतुन मार्गदर्शक तत्वानुसार घनकचऱ्याचे संकलन, वाहतुक व त्यावरील प्रक्रिया यासाठी खालील प्रमाणे मशिनरीज व वाहने खरेदी करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे रक्कम रु. दोन कोटी चोविस लक्ष पन्नास हजार ला आ.प्र. मान्यता व्हावी. तसेच वरील प्रमाणे वाहने व मशिनरीज खरेदी पश्चात त्यांचा विमा काढणे, पासिंग करणे, किरकोळ एक्सेसरीज बसविण्यासाठी लागणाऱ्या खर्चास देखील आर्थीक व प्रशासकिय मान्यता प्रदान करणेची मान्यता व्हावी.

| अ.क्र. | प्रकार | संख्या | अंदाजे दर रु. | अंदाजे किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | डिसील्टींग मशीन | 03 | 10,00,000/- | 30,00,000/- |
| 2. | नाला मॅन मशीन | 02 | 6,50,000/- | 13,00,000/- |
| 3. | नाला मॅन मशीनसाठी ट्रॅक्टर | 03 | 6,50,000/- | 19,50,000/- |
| 4. | JCB 2 DX Machine | 02 | 22,50,000/- | 45,00,000/- |
| 5. | JCB 3 DX Machine | 01 | 29,00,000/- | 29,00,000/- |
| 6. | Tractor Trolley | 04 | 8,50,000/- | 34,00,000/- |
| 7. | Innova Car मा. महापौर व आयुक्तयांचे तपासणी पथकासाठी | 02 | 16,00,000/- | 32,00,000/- |
| 8. | Tata Sumo Gold Jeep नियंत्रणा करीता | 04 | 5,50,000/- | 22,00,000/- |
| | एकुण रुपये | | | 2,24,50,000/- |

वरील प्रमाणे वाहने व मशिनरीज खरेदी नंतर आवश्यकते नुसार वाहन चालकांची कंत्राटी पध्द्तीने भरती करण्यास देखील मान्यता व्हावी. सदरचा ठराव याच सभेत कायम करण्याची शिफारस आहे.

**विषय क्र.६**

केंद्र शासन व राज्य शासन यांचे वतीने महानगरपालिकेच्या विविध योजनेंच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येत असलेल्या बैठकीस दिल्ली, मुंबई येथे उपस्थित राहण्यासाठी महापौर, आयुक्त यांना निमंत्रीत करण्यात येते. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेचे प्रस्ताव सादर करुन त्यास शासनाची मान्यता मिळविणेसाठी प्राप्त प्रस्तावाची माहिती पुरविणे, बैठकीस उपस्थित राहणे, दिलेल्या सुचनेनुसार माहिती सादर करणे ई.कामासाठी महापौर, आयुक्त यांना मुंबई व दिल्ली येथे जावे लागते, तसेच देशातील विविध महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनेची माहिती घेण्यासाठी वारंवार जावे लागते त्यामूळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (१) फ नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ठराव क्रं. १५९ दिनांक २०.०२.२००७ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिति, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व सभापती महिला बाल कल्याण समिती यांना द्यावयाचे प्रवास भत्ते संदर्भात मान्यता दिलेली आहे. परंतु सदरील प्रवास भत्याचे दर सालसन २००७ चे असून सध्याच्या महागाईचा विचार करता ते कालबाहय झालेले असून, दिल्ली येथील महाराष्ट्र सदनाचे निवासभाडे सध्या रु.६०००/-द्यावे लागते, व इतरही शहरातील निवास भाडयात वाढ झालेली असल्यामूळे खालील प्रमाणे प्रवास भत्ते देण्याच्या सुधारीत विनियमास मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर सादर.

<u>संक्षिप्त नांव व संज्ञा:-</u>

१) या विनियमांना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिति, सभागृहनेता, विरोधी पक्षनेता व सभापती महिला बालकल्याण समिती, यांना द्यावयाचे प्रवास भत्ते देणे संबंधीचे विनियम असे संबोधण्यात येईल.

मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता व मा. सभापती महिला बालकल्याण समिती यांना द्यावयाचे प्रवास भत्ते.

१) मा. महापौर, मा. आयुक्त हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु. ८,०००/- अनुज्ञेय राहील.

२) मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु.५,०००/- अनुज्ञेय राहील.

३) मा.सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, व मा. सभापती महिला व बालकल्याण समिती हे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बाहेर गांवी गेल्यास प्रवास भत्ता म्हणुन प्रतिदिनी (२४) तासाकरिता रु. ३,०००/- अनुज्ञेय राहील.

**विषय क्र. ७**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात येणा-या सर्व खाजगी हॉस्पीटल , मॅटनिर्टी नर्सिंग होम दवाखाने पॅथालॉजी लॅब क्लिनीक ई.नरसिंग होम ऍक्ट नुसार (रजिस्ट्रशन) नोंदणी नुतनीकरण करणे अनिवार्य आहे. राज्य शासनास शुश्रुषागृहाच्या नोंदणी करीता शुश्रुषागृह ज्या क्षेत्रामध्ये आहे ते क्षेत्र अशा शुश्रुषागृहामध्ये उपलब्ध्द असलेल्या खाटाची संख्या तिथे करण्यात येणार विशेषोपचार या गोष्टी लक्षात घेवून फि चे निरनिराळे दर विहित करण्याकरीता सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

दवाखान्यातील खाटाचा तपशिल ग्रुप व नोंदणी /पुनर नोंदणी तीन वर्षाकरीताची फिस

| अ.क्र. | दवाखान्यातील खाटाचा तपशिल | ग्रुप | नोंदणी व तीन वर्षाकरीता नुतनीकरण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २०० खाटापेक्षा जास्त | A | २०,०००/- |
| २ | १०० ते २०० | B | १५,०००/- |
| ३ | ५० ते १०० (वैयक्तीक ) | C | १०,०००/- |
| ४ | ५० ते १०० (ट्रस्ट ) | D | ७,५००/- |
| ५ | २० ते ५० खाटाव्यक्तीरिक्त वैयक्तीक | E | ५,०००/- |
| ६ | २० ते ५० ट्रस्ट | F | २,५००/- |
| ७ | १० पेक्षा कमी खाटाचे रुग्णालय | G | १,०००/- |
| ८ | पॅथालॉजी लॅब,ब्लब बॅंक | H | १,०००/- |

**विषय क्र.८**

**प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका पाणी पुरवठा व मलनि:स्सारण दुरूस्ती करीता क्षेत्रिय कार्यालय क्रं.ड (सिडको) मध्ये श्री डि.एम.पाटील, कंत्राटदार हे मागील सालसन २०११-१२ पासुन काम करीत आहेत, असे समजते.क्षेत्रीय कार्यालय क्रं.ड सिडको मध्ये एकूण ०५ प्रभाग आहेत.मागील ०३ वर्षापासून संबंधित कंत्राटदारास हे त्यांना देण्यात आलेले काम करीत नसल्याचे दिसून येत आहे या भागातील पाणी गळतीमुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे व मलनि:स्सारण व्यवस्था (ड्रेनेज) तंबलेले आहेत.रस्त्यावर घाण दिस असल्याचे अनेकवेळा प्रशासनास तोंडी व लेखी कळवुन सूध्दा संबधीत कंत्राटदाराने ही कामे केली नाहीत परंतू संबंधिताने कोटयावधी रूपयांचे देयके महापालिकेत सादर केलेली आहेत.

सध्या उप अभियेता हे अग्रिम रक्कम उचलून महापालीकेमार्फत कामे करून घेत आहेत.त्यामुळे सदरील कामाची चौकशी करण्यासाठी सिडको झोन अतर्गत येणा-या प्रभागातील सदस्यांचा समावेश करून एक चौकशी समिती गठीत करण्यासाठी व चौकशी अहवाल दिल्यानंतरच नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यास ही महानगरपालीका सर्वसाधारण सभा सर्वानूमते मान्यता देते.

**सुचकः-** संजय गंगाधर मोरे **अनुमोदकः-** अभिषेक सौदे, सौ.वैजयंती भिमराव गायकवाड, संदीप चिखलीकर, सौ.सिंदूताई पांडुरंग काकडे, डॉ.करूणा जमदाडे, इंदूबाई घोगरे, मंगलाताई देशमुख,सौ.ललिता बोकारे.

**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**महापौर,**
.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.